# परिशिष्ट " अ "

**सांस्कृतिक कार्यक्रमाबाबत विचारात घ्यावयाचे मुद्दे.**

१ त्या त्या विद्यापीठाने संबंधित शहरातील सर्वात मोठया सभागृहात किंवा योग्य त्या ठिकाणी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

२ हा कार्यक्रम केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालयांसाठी नव्हे, तर संपूर्ण शहरासाठीचा असेल.

३ या कार्यक्रमासाठी विद्यापीठाने, गावातील / शहरातील साहित्यिक, अन्य कलाकार, सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय मान्यवर, संपादक-पत्रकार, भाषातज्ञ, भाषाअभ्यासक, प्राध्यापक- विद्यार्थी आणि रसिक यांना निमंत्रित करणे अपेक्षित.

४ ठरलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील कलाकारांची निवास व भोजनाची व्यवस्था ( गरजेनुसार ) करणे.

५ कार्यक्रमाचा योग्य तो प्रचार-प्रसार करणे. ( वृत्तपत्रीय जाहिराती, माहितीपत्रके, माहितीफलक ).

६ सांस्कृतिक कार्यक्रमात रंगमंचावर LED वॉलची व्यवस्था पुरवणे आणि आवश्यक ती नेपथ्य व्यवस्था पुरवणे.

७ कार्यक्रमाचे ३ कॅमेरांसह उत्तम छायाचित्रण करण्याची व्यवस्था करणे.

८ रंगमंचावर कुसुमाग्रजांची प्रतिमा अत्यावश्यक. ( दिनांक २७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरव दिन - कुसुमाग्रज जन्मदिन ).

९ सांस्कृतिक कार्यक्रमात योग्यवेळी (शक्यतो समारोपाच्या गाण्याआधी ) ४ पुरस्कार विजेत्यांवरील AVs ( २०-२५ मि. ) दाखविण्याची व्यवस्था.

**इतर मुद्दे -**

१ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व प्रकारच्या महाविद्यालयांत " मराठी भाषा व साहित्य मंडळ " स्थापन करण्यासाठी पाठपुरावा करणे.

२ या मंडळांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याची व्यवस्था ( प्रामुख्याने दि.२७ फेब्रुवारी, दि.१५ ऑक्टोबर - वाचन प्रेरणा दिन व अन्य अनुषंगिक कार्यक्रमांसाठी ही आर्थिक तरतूद असेल. )

३ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचा यथोचित कार्यक्रम साजरा व्हावा.

४ शासन परिपत्रक व संबंधित उपक्रम सूची प्रत्येक महाविद्यालयापर्यंत पोहोचविणे आवश्यक.

५ केवळ मराठी भाषा विभाग किंवा मराठी वाड़मय मंडळ किंवा ग्रंथालये यांनी योजलेला कार्यक्रम असे स्वरुप नसावे.

६ सर्व प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये, सर्व विभागांच्या सहभागातून कार्यक्रम होतील, याबाबत पाठपुरावा करणे.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन




# मराठी भाषा गौरव दिन

## दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ : मराठी भाषा दिन — उपक्रम सूची

### पहिल्या तीन उपक्रमांना विशेष प्राधान्य द्यावे.

१. **'मोबाईलवर मराठी'** -

- बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) **लिपिकार** या मुक्त ॲपच्या माध्यमातून **मोबाईलवर मराठीतून टंकलेखन** आणि **स्वरचक्र** या फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मराठीतून मोबाईलवर टंकलेखन करा.
- लिपीकारसारखे मराठी वॉईस टायपिंग कीबोर्ड, स्पीचनोटस्, हियर टु रीड मराठी, वॉइस टु टेक्स्ट, मराठी की बोर्ड असे ॲप्सचे **अनेक पर्याय** "बोलू तसे मराठी टंकलेखन" करण्यासाठी **उपलब्ध** आहेत.
- स्वरचक्रप्रमाणे स्पर्श, पाणिनी, गुगल इंडीक असे ॲप्सचे अनेक पर्याय मराठी टंकलेखन करण्यासाठी उपलब्ध आहेत.

२. **'संगणकावर मराठी'** -

- संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा आणि unicode.vinodtawde@gmail.com वर मराठीतून (देवनागरी लिपी) मेल पाठवा.
- **मेल पाठवण्याची कृती-**
- महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्र पाहा. त्यानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.
- युनिकोड मराठीत टंकलेखन करून unicode.vinodtawde@gmail.com या इ- पत्त्यावर मा. ना. श्री. विनोद तावडे, मराठी भाषा मंत्री यांना यथोचित संदेश पाठवा.

३. **शाळा व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी मराठी अभिमान गीत गायन.**

- कवी सुरेश भट यांनी लिहिलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेल्या **"लाभले आम्हास भाग्य" या गीताचे समूह गायन** करा.
(सकाळ सत्र सकाळी ११ वाजता व दुपार सत्र दुपारी ४ वाजता)

४. मराठी भाषेसंबंधित विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे. तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

५. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

६. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.

७. युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

८. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dirhe.org. in E-Mail : mavi.dhepune@gmail.com
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.: उशिसं/मराठी भाषा गौरव दिन/मवि-१/२०१७/ईमेलद्वारे/1162 दि.२५/१/२०१८ 25 JAN 2018

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण.महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विदयापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय: श्री. वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन, "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ: शासन परिपत्रक क्र.: बैठक-२४१३/(प्र.क्र.०४/१७)/समन्वय, दिनांक २०/१/२०१८**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासनपरिपत्रकात नमूद केल्यानुसार कळविण्यात येते की, श्री. वि.वा. शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेच्या साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषेला मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून व मातृभाषेचा गौरव म्हणून श्री. वि. वा. शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून सन २०१३ पासून साजरा करण्यात येतो. या संदर्भात मागीलवर्षी दि. २० जानेवारी, २०१७ व दि.२३ फेब्रुवारी, २०१७ नुसार सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या. परिणामी राज्यातील उच्च शिक्षण संस्था/महाविदयालये/विदयापीठे यामध्ये मोठया प्रमाणात व उत्साहात सदरहू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तशाच प्रकारे यावर्षी देखील मराठी भाषा गौरव दिन दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी राज्यभर साजरा करावयाचे, राज्य शासनाने ठरविले आहे.

या कार्यक्रमासाठी विचारात घ्यावयाचे मुददे उपरोक्त शासनपरिपत्रकामध्ये नमूद केले आहेत. संदर्भाधीन शासन परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.सदर शासनपरित्रिकामध्ये दिलेल्या सूचनांनुसार पुढील कार्यवाही करावी. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत,

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
24 JAN 2018
आवक क्रमांक:- 2060
शाखा:-

श्री. वि. वा शिर[illegible] ऊर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन, " मराठी भाषा गौरव दिन " म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.०४/१७)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २० जानेवारी, २०१८.

शासन परिपत्रक -

श्री.वि.वा.शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेच्या साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषेला मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून व मातृभाषेचा गौरव म्हणून श्री. वि.वा.शिरवाडकर, उर्फ कुसुमाग्रज यांचा दि.२७ फेब्रुवारी हा जन्मदिन " मराठी भाषा गौरव दिन " म्हणून सन २०१३ पासून साजरा करण्यात येतो. यासंदर्भात मागीलवर्षी दि.२० जानेवारी, २०१७ व दि.२३ फेब्रुवारी, २०१७ नुसार सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या. परिणामी राज्यातील उच्च शिक्षण संस्था/ महाविद्यालये / विद्यापीठे यामध्ये मोठया प्रमाणात व उत्साहात सदरहू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तशाच प्रकारे यावर्षी देखील मराठी भाषा गौरव दिन दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी राज्यभर साजरा करावयाचे, राज्य शासनाने करावयाचे ठरविले आहे. या कार्यक्रमासाठी खालील मुद्दे विचारात घेण्यात यावे. :-

१. त्या त्या विद्यापीठाने संबंधित शहरातील सर्वात मोठया सभागृहात किंवा योग्य त्या ठिकाणी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.
२. हा कार्यक्रम केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालयांसाठी नव्हे, तर संपूर्ण शहरासाठीचा असेल.
३. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाने, गावातील / शहरातील साहित्यिक, अन्य कलाकार, सामाजिक- सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय मान्यवर, संपादक-पत्रकार, भाषातज्ञ, भाषाअभ्यासक, प्राध्यापक- विद्यार्थी आणि रसिक यांना

निमंत्रित करणे अपेक्षित.

४ ठरलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील कलाकारांची निवास व भोजनाची व्यवस्था (गरजेनुसार) करणे.

५ कार्यक्रमाचा योग्य तो प्रचार-प्रसार करणे. ( वृत्तपत्रीय जाहिराती, माहितीपत्रके, माहितीफलक ).

६ सांस्कृतिक कार्यक्रमात रंगमंचावर LED वॉलची व्यवस्था पुरवणे आणि आवश्यक ती नेपथ्य व्यवस्था पुरवणे.

७ कार्यक्रमाचे ३ कॅमेरांसह उत्तम छायाचित्रण करण्याची व्यवस्था करणे.

८ रंगमंचावर कुसुमाग्रजांची प्रतिमा अत्यावश्यक. ( दिनांक २७ फेब्रुवारी - मराठी भाषा गौरव दिन -कुसुमाग्रज जन्मदिन ).

९ सांस्कृतिक कार्यक्रमात योग्यवेळी (शक्यतो समारोपाच्या गाण्याआधी ) ४ पुरस्कार विजेत्यांवरील AVs ( २०-२५ मि. ) दाखविण्याची व्यवस्था.

इतर मुद्दे -

१ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व प्रकारच्या महाविद्यालयांत " मराठी भाषा व साहित्य मंडळ " स्थापन करण्यासाठी पाठपुरावा करणे.

२ या मंडळांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याची व्यवस्था ( प्रामुख्याने दि.२७ फेब्रुवारी, दि.१५ ऑक्टोबर - वाचन प्रेरणा दिन व अन्य अनुषंगिक कार्यक्रमांसाठी ही आर्थिक तरतूद असेल. )

३ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचा यथोचित कार्यक्रम साजरा व्हावा.

४ शासन परिपत्रक व संबंधित उपक्रम सूची प्रत्येक महाविद्यालयापर्यंत पोहोचविणे आवश्यक.

५ [redacted]

६ सर्व प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये. सर्व विभागांच्या सहभागातून कार्यक्रम होतील, याबाबत पाठपुरावा करणे.

याशिवाय खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. :-

१) मराठी भाषेचा उगम, विकास, समृध्दी, भवितव्य तसेच सदरहू भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक/विद्यार्थी यांनी लेख लिहून तो मराठी विकीपिडीयावर उपलब्ध करण्यात यावा.

२) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे व स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे व संलग्नित सर्व महाविद्यालयात खालील नमूद उपक्रमांपैकी योग्य तो उपक्रम राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

३) विद्यापीठांनी नेहमीप्रमाणे त्यांच्या कॅम्पसऐवजी कॅम्पसबाहेर शक्यतोवर विद्यापीठ मुख्यालयी असलेल्या शहरातील ऐतिहासीक ठिकाणे/ सांस्कृतिक सभागृहे/ मोठ मोठे चौक/ प्रांगण इत्यादी ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करावे. ( उदा. पुणे येथील शनिवार वाडा, दगडुशेट गणपती, नाशिक येथील गोदातीर, औरंगाबाद येथील आमखास मैदान इत्यादी ).

४) सदरहू कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त सर्व सामान्य जनतेचा सहभाग राहिल याबाबत आवश्यक ते नियोजन व योग्य अंमलबजावी करावी.

५) सदर कार्यक्रम मराठी भाषा प्रवास व विकास या सुत्राभोवती गुंफलेला असावा.

६) नेटके व भव्य आयोजन व मान्यवरांसोबत रसिकांची जास्तीत जास्त उपस्थिती ही जबाबदारी आयोजक विद्यापीठावर राहिल.

महत्वाच्या उपक्रमांची सुची :-

१) मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाज जीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रम आयोजित करणे.

२) सकस साहित्याची, नव्या माहितीची आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर ग्रंथप्रदर्शन/ ग्रंथोत्सव/ ग्रंथदिंडी आयोजित करणे.

३) शाळा/महाविद्यालये/शासकीय व निमशासकीय कार्यालये/खाजगी संस्थांमध्ये विविध स्तरांवर मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीविषयक विविध प्रकारच्या स्पर्धा ( निबंध,वक्तृत्व इ.) आयोजित करणे.

४) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शासनाच्या विविध उपक्रमांना प्रसिध्दी देणे.

५) आकाशवाणी व दूरदर्शनवरून सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मराठी भाषा विषयक मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करणे.

६) मराठी भाषा/साहित्य कोष वाङ्मय या विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन तसेच तज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन.

७) प्रचारमाध्यमे तसेच प्रशासनात मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादर करणे यांचे आयोजन.

८) युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधीत विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

९) समाजप्रसार माध्यमांतील ( सोशल मिडीया ) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, माहजालावरील ( इंटरनेट ) मराठी या क्षेत्रांतील तज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे यांचे आयोजन.

१०) कुसुमाग्रज व इतर सुप्रसिध्द थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.

११) मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

१२) बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन ( व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ. )

१३) शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

१४) म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती या विषयांवर रंजक व्याख्याने/ सादरीकरणे.

१५) मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधीत कार्यशाळांचे आयोजन.

१६) मराठी कविता, प्रसिध्द उतारे, मराठी भाषा विषयक घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

१७) मोडी लिपीचे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन.

१८) मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या नि:स्पृह व्यक्ती व त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

२. " विकिपिडीया " हे जगभरातील असंख्य भाषांमध्ये कार्यरत असलेले लोकप्रिय संकेतस्थळ आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन, मराठी भाषा गौरव दिनी केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर जगभरातील मराठी जनांनी मराठी देवनागरी लिपितील किमान एक परिच्छेद / मजकूर मराठी विकीपिडीयावर टंकलिखित करावा असे आवाहन मा. मंत्री महोदयांनी केले आहे. या आवाहानाला प्रतिसाद देत आपल्या विभागाशी संबंधित विविध क्षेत्रातील मान्यवरांसह महाविद्यालयीन विद्यार्थी /प्राध्यापक /सर्व शासकीय तसेच निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून, महाजालावरील मराठी लेखनाला कृतीशिल प्रतिसाद द्यावा. या अनुषंगाने आपल्याशी संबंधित विविध योजनांची माहिती, त्याचप्रमाणे त्या त्या क्षेत्रातील तज्ञांची माहिती मराठी भाषेमध्ये मराठी विकीपिडीयावर देण्यात यावी.

३. विकीपिडीयावर लेखन कसे करावे यासंदर्भात या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती श्री. राहुल देशमुख, आय. आय. टी., पवई, मुंबई यांनी केलेले मार्गदर्शन मराठी भाषा विभागाने दि. २१ जानेवारी, २०१७ च्या परिपत्रकाद्वारे दिलेले आहे. या प्रक्रियेबाबत काही अडचण /शंका निर्माण झाल्यास या प्रकल्पावर काम करणाऱ्या श्री. हरिश सातपुते, भ्रमणध्वनी क्रमांक : ९६१९६०९६३७, ई-मेल: marathiwikipedia@gmail.com यांच्याशी संपर्क साधावा. या सुविधेचा वापर करुन, आपला विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांनी मराठी भाषा विकास संवर्धनात आपले योगदान द्यावे. तसेच विकीपिडीयावर लेखन करण्यासंदर्भात मराठी भाषा विभागामार्फत प्रशिक्षण दिले जाते. त्याचा लाभ घेण्यात यावा व जेथे संगणक प्रयोगशाळा ( Computer Lab ) असेल तेथे प्रशिक्षण आयोजित करावे.

४. सन १९६० पासून मराठी ही कायदेशीर आणि वैधानिक दृष्टया राजभाषा आहे. त्यामुळे मराठी भाषेचे लोकभाषा म्हणून जतन करणे आणि ज्ञानभाषा म्हणून संवर्धन होणे आवश्यक आहे. याकरीता विद्यापीठे व महाविद्यालये यांची महत्वाची भूमिका आहे म्हणून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांनी आणि सर्व महाविद्यालयांनी " मराठी भाषा व साहित्य मंडळ " स्थापन करावे. या मंडळाच्या माध्यमातून दैनंदिन जीवनातील मराठी ते आधुनिक तंत्रज्ञानातील मराठी याबाबतचे उपक्रम घेण्यात यावेत. तसेच मंडळाने साहित्यिक - सांस्कृतिक उपक्रमांची आखणी करावी. कार्यक्रमांचे स्वरुप मंनोरंजनात्मक, प्रबोधनात्मक व प्रशिक्षणात्मक असावे. मराठी भाषेचा व साहित्याचा विकास हे कार्यक्रमाचे सुत्र व उद्दिष्ट असावे. मराठी भाषा व साहित्य मंडळाच्या कार्यामध्ये विद्यापीठे आणि महाविद्यालयातील सर्व विभाग, शाखा व अभ्यासक्रम यामधील विद्यार्थ्यांचा सहभाग असावा. या मंडळाच्या उपक्रम - कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद संबंधित संस्थांनी करावी. उपक्रम - कार्यक्रमाबाबतचा ठराव व्यवस्थापन समिती (मॅनेजमेंट कमिटी) मध्ये करण्यात यावा.

५. [redacted]

६. सदरहू कार्यक्रम अकृषी विद्यापीठे / महाविद्यालयांच्या कॅम्पसबाहेर होणार असल्याने, शहरातील सांस्कृतिक सभागृहे / प्रांगण / ऐतिहासिक ठिकाणे/ चौक इत्यादि ठिकाणांचे / जागांचे कार्यक्रमासाठीचे आरक्षण विहित कालावधीपूर्वी करण्यात यावे. सह संचालक, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण यांनी अकृषी विद्यापीठे यांचेशी संपर्क करुन, सदरहू कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावा.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०१२२१२४९३९३००८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सिद्धार्थ खरात
(शासनाचे उप सचिव)

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, शालेय शिक्षण, सांस्कृतिक कार्य विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा / विधानपरिषद), विधान भवन, मुंबई.
मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे /स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे.
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे /स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण.
सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (समन्वय).

जा.क्र.मंत्री/शा.शि.,क्री.यु.क.,उ.तं.,म.भा.,सां.का.,अ.वि.व व.,
टिप्पणी क्र. ८९ /२०१८ दिनांक : ०६.०२.२०१८.

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**विनोद तावडे**
**मंत्री**
**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : ६.०२.२०१८

सप्रेम नमस्कार!

**आपणा सर्वांना मराठी भाषा गौरव दिनाच्या खूप शुभेच्छा!** ज्येष्ठ कवी व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस दि. २७ फेब्रुवारी, हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून, शासनाच्या वतीने विविधांगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी, आपण '**चलभाषावर (मोबाईलवर) मराठी**' आणि '**संगणकावर मराठी**' या विषयांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. मराठी भाषेचा विकास साधण्यासाठी चलभाषावर व संगणकावर मराठीचा वापर वाढणे अत्यावश्यक आहे.

'बोलू तसे टंकलेखन (स्पीच-टु-टेक्स्ट) करणाऱ्या' लिपिकार आणि फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या स्वरचक्र या विनामूल्य ॲप्सच्या माध्यमातून मराठीतून टंकलेखन करता येणं सहज शक्य आहे. तसेच संगणकावर मराठीसाठी युनिकोड आधारित मराठीची उत्तम सुविधा उपलब्ध आहे.

मराठी भाषा गौरव दिनी, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा यांचे संस्थाप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी **चलभाषावर (मोबाईलवर) मराठी कार्यान्वित करावी.** तसेच **संगणकावर युनिकोड-मराठी सुरू करून, मला unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर टंकलिखित संदेश पाठवावा,** असे आग्रही आवाहन मी करीत आहे. त्याचबरोबर आपण आपल्या संस्थेत मराठी अभिमान गीताचे समूह गायनही करावे. (सोबतच्या उपक्रम सूचीत तपशील दिला आहे.)

सर्व प्रमुखांनी आपल्या अधीनस्त असणाऱ्या सर्व संस्थांना याबाबत अवगत करावे व त्याचा अनुपालन अहवाल इ-टपालाद्वारे मला पाठवावा. प्राचीन भाषांपैकी एक असलेल्या आणि भारतातील अधिकृत भाषांपैकी एक असलेल्या मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल, याची खात्री आहेच.

**सहपत्र — उपक्रमांची सूची.**

आपला,

(स्वाक्षरी)

**(विनोद तावडे)**

## दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ : मराठी भाषा दिन — उपक्रम सूची

### पहिल्या तीन उपक्रमांना विशेष प्राधान्य द्यावे.

१. **'मोबाईलवर मराठी'** -

- बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) **लिपिकार** या मुक्त ॲपच्या माध्यमातून **मोबाईलवर मराठीतून टंकलेखन** आणि **स्वरचक्र** या फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मराठीतून मोबाईलवर टंकलेखन करा.
- लिपीकारसारखे मराठी वॉईस टायपिंग कीबोर्ड, स्पीचनोटस्, हियर टु रीड मराठी, वॉइस टु टेक्स्ट, मराठी की बोर्ड असे ॲप्सचे **अनेक पर्याय** "बोलू तसे मराठी टंकलेखन" करण्यासाठी **उपलब्ध** आहेत.
- स्वरचक्रप्रमाणे स्पर्श, पाणिनी, गुगल इंडीक असे ॲप्सचे अनेक पर्याय मराठी टंकलेखन करण्यासाठी उपलब्ध आहेत.

२. **'संगणकावर मराठी'** -

- संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा आणि unicode.vinodtawde@gmail.com वर मराठीतून (देवनागरी लिपी) मेल पाठवा.
- **मेल पाठवण्याची कृती-**
- महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्र पाहा. त्यानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.
- युनिकोड मराठीत टंकलेखन करून unicode.vinodtawde@gmail.com या इ- पत्त्यावर मा. ना. श्री. विनोद तावडे, मराठी भाषा मंत्री यांना यथोचित संदेश पाठवा.

३. **शाळा व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी मराठी अभिमान गीत गायन.**

- कवी सुरेश भट यांनी लिहिलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेल्या **"लाभले आम्हास भाग्य" या गीताचे समूह गायन** करा.
  (सकाळ सत्र सकाळी ११ वाजता व दुपार सत्र दुपारी ४ वाजता)

४. मराठी भाषेसंबंधित विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे. तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

५. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

६. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.

७. युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

८. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

९. कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.

१०. सन २०१७ – १८ हे वर्ष कविवर्य विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने, विंदांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करावे.

११. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

१२. मराठीतील कोश वाङ्‌मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

१३. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

१४. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

१५. म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती – या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

१६. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

१७. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

१८. मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन

१९. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी अत्युच्च त्यागासह कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

२०. इयत्ता १० वीं व इ.१२ वी च्या परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

२१. पुस्तकांचं गाव - भिलार (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या महाराष्ट्र शासनाच्या अभिनव प्रकल्पाविषयी माहिती देणे. तसेच पुस्तकांच्या गावास भेट देणे.

---

**टीप :** आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमुद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.

# मराठी भाषा गौरव दिन

**दि. २७ फेब्रुवारी, २०१८**

# उच्च व तंत्र शिक्षण विभागाची जबाबदारी

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून **विद्यापीठे व महाविद्यालये (सर्व शाखा) यांनी मराठी भाषा जतन व संवर्धनासाठी विविध कार्यक्रम व उपक्रम योजणे अपेक्षित** आहे.

प्रामुख्याने **दि. २७ फेब्रुवारी रोजीचा कार्यक्रम योजताना विद्यापीठ प्रशासनाने पुढील मुद्दे लक्षात घेणे आवश्यक** आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रमाविषयी – (मराठी भाषेचा विकास, प्रवास आणि भाषेची स्थित्यंतरे यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम)**

१ त्या त्या विद्यापीठाने संबंधित शहरातील सर्वांत मोठ्या सभागृहात / नाट्यगृहात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

२ हा कार्यक्रम केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालयांसाठी नव्हे, तर संपूर्ण शहरासाठीचा असेल.

३ या कार्यक्रमासाठी विद्यापीठाने, गावातील / शहरातील साहित्यिक, अन्य कलाकार, सामाजिक-सांस्कृतिक संस्थांचे पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी, संपादक-पत्रकार, भाषातज्ज्ञ, भाषाअभ्यासक, प्राध्यापक-विद्यार्थी आणि रसिक यांना निमंत्रित करणे अपेक्षित.

४ ठरलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातील कलाकारांची निवास व भोजनाची व्यवस्था (गरजेनुसार) करणे.

५ कार्यक्रमाचा योग्य तो प्रचार-प्रसार करणे. (वृत्तपत्रीय जाहिराती, माहितीपत्रके, माहितीफलक इ. माध्यमातून)

६ सांस्कृतिक कार्यक्रमात रंगमंचावर LED वॉलची व्यवस्था पुरवणे आणि आवश्यक ती नेपथ्य व्यवस्था पुरवणे.

७ कार्यक्रमाचे ३ कॅमेरांसह उत्तम छायाचित्रण करण्याची व्यवस्था करणे.

८ रंगमंचावर कुसुमाग्रजांची प्रतिमा अत्यावश्यक. (२७ फेब्रुवारी - कुसुमाग्रज जन्मदिन)

९ सांस्कृतिक कार्यक्रमात योग्य वेळी (शक्यतो समारोपाच्या गाण्याआधी) ४ पुरस्कार विजेत्यांवरील AVs (२०-२५ मि.) दाखविण्याची व्यवस्था.

① कार्यक्रम शहरातच करावयाचा कि तो कार्यक्रम शहराचा आहे
② बजेटची व्यवस्था 8 ते 10 लाख करावी
③ कार्यक्रम प्रमुख ठरवण्यात यावा
④

संपादक, पत्रकार, साहित्यिक, समाज मंडळ, इतर.
Celebration स्वागत पाहिजे
मावळणकर / देवळणकर / खरात - संपर्क साधावा

**अन्य मुद्दे -**

१ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व प्रकारच्या महाविद्यालयांत 'मराठी भाषा व साहित्य मंडळ' स्थापन करणे. या मंडळाच्या माध्यमातून वर्षभर नियमितपणे सुसंगत कार्यक्रम व्हावेत.

२ या मंडळांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्याची व्यवस्था करणे. (प्रामुख्याने २७ फेब्रुवारी, १५ ऑक्टोबर - वाचन प्रेरणा दिन व अन्य आनुषंगिक कार्यक्रमांसाठी ही आर्थिक तरतूद असेल).

३ विद्यापीठ क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचा यथोचित कार्यक्रम साजरा व्हावा.

४ मा. मंत्री महोदयांचे पत्र व संबंधित उपक्रम सूची प्रत्येक महाविद्यालयापर्यंत पोहोचविणे आवश्यक.

५ केवळ मराठी भाषा विभाग किंवा मराठी वाड.मय मंडळ किंवा ग्रंथालये यांनी योजलेला कार्यक्रम, असे स्वरूप नसावे.

६ सर्व प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये, सर्व विभागांच्या सहभागातून कार्यक्रम होतील, याबाबत पाठपुरावा करणे.

## मराठी भाषा गौरव दिन २०१८, दि.२७.०२.२०१८

## महाराष्ट्रात विविध ठिकाणी (विद्यापीठांच्या माध्यमातून) होणाऱ्या कार्यक्रमांची संभाव्य संकल्पना व रूपरेषा

१. मराठी भाषेचा प्रवास व विकास या मुख्य सूत्राभेवतीच गुंफलेला कार्यक्रम असावा.

२. कार्यक्रम सांगीतिक मनोरंजन करणारा आणि भाषा व साहित्याची रंजक, प्रबोधक माहिती देणारा असावा.

३. मराठी भाषा व साहित्य क्षेत्रातील थोर व्यक्ती आणि त्यांच्या कलाकृती / साहित्यकृती / विचार, इ. चा समावेश असावा.

४. यंदाचे वर्ष श्रेष्ठ कवी ज्ञानपीठ विजेते विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे, याचा यथायोग्य विचार व्हावा.

५. सुप्रसिद्ध अभ्यासक व विचारवंतांच्या मराठी भाषा किंवा मातृभाषा यांबद्दलच्या विचारांचा समावेश असावा.

६. भावगीते, नाट्यगीते, लोकगीते, चित्रपटगीते यांबरोबरच मराठी साहित्यातील कविता, नाटक, कथा, कादंबरी या घटकांचाही समावेश असावा.

७. कार्यक्रमात १-२ आनुषंगिक नृत्य - सादरीकरणेही अपेक्षित.

८. कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक, वादक व अभिवाचक यांचा अंतर्भाव असावा.

९. दोन ते सव्वा दोन तासांचा कार्यक्रम (मिनिट-टु-मिनिट नियोजनासह) तयार करावा.

१०. मराठी भाषा विभागाच्या वतीने या वर्षी जाहीर झालेल्या भाषा व साहित्य क्षेत्रातील चार सर्वोच्च पुरस्कार विजेत्यांच्या एव्हीज् (एकूण १५ ते २० मि.) कार्यक्रमात दाखवणे अपेक्षित.

अन्य मुद्दे-

- तात्काळ कार्यक्रमाची चौकट (थीम) संक्षिप्त स्वरुपात, संभाव्य कलाकार आणि अंदाजपत्रक बजेट यांचे टिपण सादर करणे अपेक्षित.

**विद्यापीठांची यादी (पुढील ठिकाणी कार्यक्रम होऊ शकतात.)**

---

१. मुंबई विद्यापीठ (सदर कार्यक्रम रत्नागिरी येथे होऊ शकतो)

२. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे

३. श्री संत गाडगे महाराज विद्यापीठ, नागपूर

४. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

७. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, अमरावती

८. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

९. एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई (सदर कार्यक्रम सांगली येथे होऊ शकतो)

१०. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

११. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक

१२. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# मराठी भाषा गौरव दिन – प्रमुख उपक्रम

## पुढील ३ उपक्रमांवर अधिक लक्ष केंद्रीत करावे.

१. **'मोबाईलवर मराठी'** –

- बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) **लिपिकार** या मुक्त ॲपच्या माध्यमातून **मोबाईलवर मराठीतून टंकलेखन** आणि स्वरचक्र या फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मराठीतून मोबाईलवर टंकलेखन करा.
- लिपीकारसारखे मराठी वॉईस टायपिंग कीबोर्ड, स्पीचनोटस्, हियर टु रीड मराठी, वॉइस टु टेक्स्ट, मराठी की बोर्ड असे ॲप्सचे **अनेक पर्याय** "बोलू तसे मराठी टंकलेखन" करण्यासाठी उपलब्ध आहेत.
- स्वरचक्रप्रमाणे स्पर्श, पाणिनी, गुगल इंडीक असे ॲप्सचे अनेक पर्याय मराठी टंकलेखन करण्यासाठी उपलब्ध आहेत.

२. **'संगणकावर मराठी'** –

- संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा आणि unicode.vinodtawde@gmail.com वर मराठीतून (देवनागरी लिपी) मेल पाठवा.
- **मेल पाठवण्याची कृती**–
- महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्र पाहा. त्यानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.
- युनिकोड मराठीत टंकलेखन करून unicode.vinodtawde@gmail.com या इ- पत्त्यावर मा. ना. श्री. विनोद तावडे, मराठी भाषा मंत्री यांना यथोचित संदेश पाठवा.

३. **शाळा व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी मराठी अभिमान गीत गायन.**

- कवी सुरेश भट यांनी लिहिलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेल्या **"लाभले आम्हास भाग्य"** या गीताचे समूह गायन करा.

(सकाळ सत्र सकाळी ११ वाजता व दुपार सत्र दुपारी ४ वाजता)

# मराठी भाषा गौरव दिन २०१८, दि. २७ फेब्रुवारी, २०१८
## सांस्कृतिक कार्यक्रम- विद्यापीठनिहाय तपशील

| | |
|---|---|
| विद्यापीठ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद |
| विद्यापीठ संपर्क | **कुलसचिव — डॉ. साधना पांडे**<br>०२४० २४० ३३३३/ २४० २०३/<br>९१४६०६४४२५ / ०९४२२७०१७५५<br>registrar@bamu.ac.in<br><br>**सहसंचालक - डॉ. राजेंद्र धामनतकर**<br>९७५७२०७९६५<br>०२४०-२३३१९१३<br>jdheaur_2007@rediffmail.com |
| सादरकर्ता संस्थेचे / व्यक्तीचे नाव | दीपक मंडळ, नाशिक<br>**सुरेश गायधनी, नाशिक**<br>९८२२५०९०७२<br>sureshgaidhani64@gmail.com |
| कार्यक्रमाचे नाव | बोलतो मराठी |
| कार्यक्रम स्थळ<br>(गावाचे व सभागृहाचे नाव) | औरंगाबाद |
| कार्यक्रमाचा दिनांक व वेळ | मंगळवार, दिनांक २७.०२.२०१८<br>सायंकाळी ६.०० वाजता |

# दीपक मंडळ (सांस्कृतिक विभाग)

(नोंदणी क्र. महा./८३०७/०३) website : www.deepakmandal.com

४, समर्थ, गंधर्व नगरी, इंदिरा नगर, नाशिक ४२२ ००९.


दि.३०/०१/२०१८

प्रति,
मा.कुलगुरु साहेब,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद.

विषय :- मराठी भाषा गौरव दिन संपन्न करणेबाबत...

महोदय,

दि. २७ फेब्रुवारी हा कविश्रेष्ठ कुसाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्म दिवस. हा दिवस शासनाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन म्हणून दर वर्षी संपन्न केला जातो.मागील वर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही हा कार्यक्रम आपल्या विद्यापिठाच्या सहकार्याने करण्याची संधी आम्हास मिळावी.ही विनंती.

यंदाच्या वर्षी **बोलतो मराठी** या विषयाला अनुसरुन आम्ही कार्यक्रमाचे नियोजन करीत आहोत. त्याचे स्वरुप व अंदाजे खर्च पुढील प्रमाणे आहे.

**कार्यक्रमाचे स्वरुप**

भारतातील प्रमुख २२ भाषांपैकी मराठी ही एक. महाराष्ट्र आणि गोवा ह्या राज्यांची अधिकृत राजाभाष असलेल्या या मराठी भाषेच्या सन्मानार्थ २७ फेब्रु.हा दिवस जागतिक मराठी भाषा दिन. या निमित्त मराठी भाषेला समृध्द व संपन्न करणाऱ्या साहित्यिक, कवी, लेखक यांना मानवंदना देण्यासाठी सादर होणाऱ्या **बोलतो मराठी** या कार्यक्रमाची थोडक्यात रुपरेषा पुढील प्रमाणे.

१. संत वाड्मयापासून ते आधुनिक काळापर्यतच्या सर्व साहित्याचा व साहित्यिकांचा धावता आढावा या कार्यक्रमातून घेण्यात येईल.संत परंपरेतील प्रमुख स्त्रोत असणाऱ्या संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत चोखामेळा, समर्थ रामदास, अशा महानुभावांचे अभंग, ओव्या, पदे, कीर्तन, भारुड, असे साहित्य नृत्य, गायन, इ.व्दारा सादरीकरणातून उभे करणे.

२. शिवकालीन साहित्यात कवी भूषण, कवी मोरोपंत यासारख्या साहित्यिकांच्या काव्य व लेखन प्रकारातून इतिहास सांगणारे उतारे, पत्र, कवन, यांचे नाट्य प्रवेशातून, लोक कला, नृत्याच्या माध्यमातून मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे मोलाचे कार्य त्याकाळातही झाल्याचे यातून प्रगट होईल.

# दीपक मंडळ (सांस्कृतिक विभाग)

(नोंदणी क्र. महा./८३०७/०३) website : www.deepakmandal.com

४, समर्थ, गंधर्व नगरी, इंदिरा नगर, नाशिक ४२२ ००९.

३. आधुनिक काळात गिरणी कामगारांचे, दलितांचे साहित्य मराठी भाषेत निर्माण झाले. या साहित्यातून परंपारिक मराठी व काळानुसार बदलत गेलेली मराठी पहायला मिळते. यांचा फार मोठा परीणाम मराठी साहित्यावर दिसून ये तो. हा बदल अभिवाचन, काव्य वाचन, या माध्यमातून श्रोत्यांच्या समोर मांडला जाईल.

४. अधुनिक मराठी साहित्यात प्रवास वर्णन, आत्मचरित्र, कथा, कादंबऱ्या, विनोदी साहित्य, हास्यकाव्य, चारोळी, असे अनेक साहित्य प्रकार प्रक्षकांच्या समोर विविध मनोरंजनाच्या माध्यमातून उलगडण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत.

संपूर्ण कार्यक्रम निवेदन,नटी सूत्रधार,नृत्य,लोककला,नाटय अभिनय,गायन,अभिवाचन यांच्या व्दारे संपन्न होईल या कार्यक्रमासाठी गायक पं.अविराज तायडे,पं.मकरंद हिंगणे,पं.सुभाष दसककर (संवादिनी),पं.नितीन वारे (तबला),नृत्यांगना कीर्ती भावाळकर व त्यांच्या शिष्या,पं.डॉ.संगीता पेठकर,अभिनेत्री अनिता दाते,सायली संजीव, लीना भागवत व विद्या करंजीकर, नुपूर सावजी, अभिनेते मंगेश कदम, दिग्पाल लांजेकर, चंद्रशेखर कुलकर्णी, दीपक करंजीकर, गिरीष जुन्नरे, शौनक गायधनी असे अनेक मान्यवर कलाकार यात सहभाग घेणार आहेत.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आयोजित**
**जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त**
**दीपक मंडळ सांस्कृतिक विभाग नाशिक निर्मित**
**कार्यक्रम - बोलतो मराठी -**
**अपेक्षित अंदाजे खर्च**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नाशिक, मुंबई, पुणे येथून **औरंगाबाद** पर्यंतचा प्रवार खर्च | खाजगी बस,कार | ५५,००० |
| २ | कलाकार व तंत्रज्ञांचे मानधन | एकूण | ६,००,००० |
| ३ | प्रकाश,ध्वनी, एल.ली.डी, फोटो,शुटिंग | भाडे / मानधन | ४५,००० |
| ४ | रंगभूषा,वेशभूषा व संगीत संयोजक | मानधन | २५,००० |
| ५ | नेपथ्य पडदा व स्टूल,लेव्हल | साहित्याचे | २५,००० |
| ६ | भोजन,चहा व नाष्टा | | २५,००० |
| | | **एकूण** | **७,७५,०००** |

कळावे

आपला स्नेहांकित

( सुरेश गायधनी )
(अध्यक्ष,दीपक मंडळ,सांस्कृतिक विभाग)

संपर्क :- ९८२२५०९०७२
E mail :- sureshgaidhani64@gmail.com
www.deepakmandal.com

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad
Inward No. 286
Office of the V.C. Sec.
Date: 8.2.18

Gmail

anita patil <osanitapatil26@gmail.com>

